क्र.वैप्रबी-२००५/प्र.क्र.१७४/आस्था-९
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक :- ३१ जुलै २००६

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद , ( सर्व )

विषय:-वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रुपये ४०,०००/- वरील देयके एक खास बाब म्हणुन शासन मान्यतेसाठी पाठवितांना घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

संदर्भ:-शासनाचे पत्र क्र.वैप्रबी-१०१/प्र.क्र. २०५/१६, दिनांक ३१ जुलै २००१ कृपया पहावे.

उपरोक्त शासन पत्रान्वये रुपये २० हजारावरील देयके एक खास बाब म्हणुन शासन मान्यतेसाठी ती पूर्णत: तपासून सर्व आवश्यक प्रमाणित प्रमाणपत्रासह पाठविण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना सूचना दिलेल्या आहेत.

२. आता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १९ मार्च २००५ च्या शासन निर्णयानुसार ही मर्यादा रुपये ४० हजार करण्यात आलेली आहे. तथापि शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद कर्मचा-याची देयके रुपये ४० हजार या रकमेपेक्षा जास्त आहेत एवढ्या एका बाबीचाच उल्लेख करुन देयके शासन मान्यतेसाठी पाठविली जातात जिल्हा स्तरावर महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार ती जिल्हा स्तरावर तपासली जात नाहीत. वैद्यकीय देयकातील कुटुंब मर्यादीत असल्याबाबत , रुग्ण अवलंबून असल्याबाबत व इतर प्रमाणपत्रे नियुक्ती प्राधिका-याकडून प्रमाणित करुन पाठविली जात नाहीत. तसेच विहित कालावधीनंतर प्राप्त झालेली देय नसलेली देयके सुध्दा शासन मान्यतेसाठी पाठविली जातात. जिल्हा आरोग्य अधिका-याची प्रमाणपत्रे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २५ फेब्रुवारी १९९९ च्या शासन निर्णयानुसार पाठविली जात नाहीत. प्रमाणपत्रात, आंतररुग्ण कालावधी , अधिका-याचे नांव पदनाम सही शिक्का तसेच आजारात आकस्मिकता होती किंवा नव्हती हे स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक असुनही जिल्हा परिषद कर्मचा-याची देयके जिल्हा स्तरावर न तपासता अपूर्ण देयके शासनास पाठविल्यामुळे कर्मचा-याची देयके मंजूर होण्यास नाहक विलंब होते या बाबत लोकायुक्ताकडे ही तक्रारी होतात.

तरी वरील बाबी टाळण्याच्या दृष्टीने शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक १८.८.१९९९, २०.८.१९९९, २१.८.१९९९, ३०.८.१९९९, दिनांक १९ मार्च २००५ व महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ मधील नियम २ (३) टिप (सात) (आठ) ११ (१) १४ व १५ व १९ मार्च २००५ मधील तरतुदीनुसार तपासून व आवश्यक त्या कागदपत्राची व प्रमाणित

प्रमाणपत्राची पूर्तता करुन खाली दिलेल्या मार्गदर्शक सूची नुसार देयक शासन मान्यतेसाठी पाठवावीत. दिनांक ३१ जुलै २००१ ची तपासणी सूची पुर्णतः भरुन कर्मचा-याची सही घेऊन व कार्यालय प्रमुखानी सांक्षांकित करुन पाठवावी. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीच्या पत्रान्वये एक खास बाब प्रस्ताव का मान्य करावा तसेच उपचारासाठी केलेला खर्च कर्मचा-याच्या आवाक्या बाहेरील का आहे ? या बाबत मुख्य कार्यकारी अधिका-याच्या स्पष्ट समर्थनासह जिल्हा स्तरावर नियमाच्या अनुषंगाने तपासून न पाठविल्यास शासन स्तरावर कार्यवाही न करता असे अपूर्ण मूळ प्रस्ताव परत करण्यात येतील अशा प्रकारे अपूर्ण प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे परत केल्यामुळे होणा-या विलंबास जिल्हा परिषद सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी :-

१. रुपये ४०,०००/- कमाल मर्यादेची अट शिथिल करुन एक विशेष बाब म्हणुन प्रस्ताव का विचारात घ्यावा तसेच वैद्यकीय खर्चापोटी सोसावा लागलेला खर्च कर्मचा-याच्या आवाक्याबाहेरील का होता या बाबतच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अभिप्रायासह त्यांच्या सहीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्ता मार्फत शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत.

२. वैद्यकीय खर्चामध्ये शक्तीवर्धक औषधे , रक्त खरेदी व बाहय रुग्ण उपचार या बाबतचा खर्च नसल्याबाबत जिल्हा परिषदेने खात्री करुन घ्यावी व परिगणना तक्त्यात स्पष्टपणे ना देय रकमा नमुद कराव्यात व देयक तपासले असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

३. खाजगी रुग्णालयात उपचार घेतले असल्यास ज्या वार्डामध्यें रुग्णास आंतररुग्ण कालावधीत ठेवले होते त्याच्या समकक्ष प्रकाराबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे व दिनांक १९.३.२००५ नुसार परिगणना पत्रक तयार करतांना अ व ब नुसार एकूण खर्च व एकूण अनुज्ञेय रक्कम टक्केवारीसह नमुद करावी. ना देय रकमाचे विवरण देवून त्या एकूण खर्चातून वगळून उपरोक्त परिगणना तक्ता पाठवावा.

४. अन्य कोणत्याही वैद्यकीय योजनेतून /धर्मादायी संस्थेकडून वैद्यकीय खर्चासाठी मदत मिळाली नसल्याबाबतचे प्रमाणित प्रमाणपत्र सादर करावे.

५. नियम शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव असेल तर कोणता नियम शिथिल करावयाचा आहे व विहित नियम शासन स्तरावरुन शिथिल करुन एक विशेष बाब प्रस्ताव का मान्य करावा या बाबत कर्मचा-याच्या निवेदनासह मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या ठोस समर्थनासह प्रस्ताव शासनास सादर करावा.

६. कुटुंब मर्यादीत असून त्यामुळे प्रतिपूर्ती देय असल्याबाबतचे शासन निर्णय दिनांक २८ नोव्हेंबर २००० नुसार खाते प्रमुखाच्या सहीचे तसे स्पष्टपणे नमुद केलेले प्रमाणित प्रमाणपत्र सादर करावे. प्रमाणपत्रासोबत रेशन कार्डाची प्रत सोबत जोडावी व अपत्याच्या बाबतीत शेवटच्या अपत्याच्या जन्मतारखेचा प्रमाणित दाखला जोडावा.

७. तातडीच्या कारणास्तव खाजगी रुग्णालयात उपचार घेतले असल्यास त्या बाबतच्या अपरिहार्य स्थिती बाबतचे कर्मचा-याने सविस्तर निवेदन सादर करावे.

८. रुग्ण आई, वडिल किंवा सासू सासरे असल्यास रुग्णास सेवानिवृती नंतर किती सेवानिवृती वेतन मिळते तसेच रुग्णाचे मासीक उत्पन्न किती आहे या बाबत तपशिल दयावा व रुग्ण पूर्णपणे कर्मचा-यावर अवलंबून असल्याबाबतचे प्रतिज्ञा पत्र सादर करावे व आई वडिल व सासू

सासरे या पैकी ज्यांची निवड केली आहे त्यांची नोंद सेवा पुस्तकात घेऊन त्याची प्रमाणित प्रत पाठवावी.

९. पती व पत्नी दोघेही शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत असल्यास कर्मचा-याच्या पती/पत्नीने देयक त्यांच्या कार्यालयामार्फत सादर केले नसले बाबत प्रमाणित करावे व दोघापैकी एकाने शासन निर्णय दिनांक १८ ऑगष्ट १९९९ मधील ६ नुसार विकल्प देवून सेवा पुस्तकातील विकल्पाच्या नोंदीची प्रत सोबत जोडावी.

१०. रुग्णाचा आजार अपघात या आकस्मिक आजारात अंतर्भुत होत असेल तर अपघात नक्की कसा झाला या बाबत कर्मचा-याचे सविस्तर निवेदन व पोलीस पंचनाम्याची प्रत सोबत जोडावी तसेच मोटारअधिनियमखाली न्यायालयाकडे वैद्यकीय खर्चापोटी किती रकमेचा दावा केला आहे व किती रक्कम मंजूर झाली आहे या बाबतची माहिती दयावी.

११. महाराष्ट्रा बाहेर उपचार घेतला असल्यास तो तेथील शासकीय रुग्णालयात घेतला आहे किंवा कसे, नसल्यास का घेतला नाही व कर्मचा-याच्या कार्यालयापासून उपचार घेतलेल्या रुग्णालयाचे व कार्यालयापासून शासकीय/शासन मान्य रुग्णालयाचे अंतर किती आहे या बाबतची माहिती दयावी. तसेच राज्याबाहेर उपचार का घेतला आहे या बाबत सविस्तर समर्थन सादर करावे.

special report Attached

१२. वेगवेगळया कालावधीची देयके एकत्र न पाठविता ती वेगवेगळी करुन स्वतंत्ररित्या व वेगवेगळया प्रमाणपत्रासहीत प्रत्येकात सर्व कागदपत्राची पूर्तता करुन सादर करावीत. कर्मचारी हा जिल्हा परिषदेचा स्थायी कर्मचारी आहे किंवा कसे या बाबतची माहिती दयावी.

१३. वैद्यकीय कालावधीच्या रजा मंजुरीच्या आदेशाची प्रत सोबत जोडावी.

C-S OR DHO. Certificate

१४. खाजगी रुग्णालयात उपचार घेतला असल्यास शासकीय/शासन मान्य रुग्णालयात का घेतला नाही या बाबत सविस्तर खुलासा करावा तसेच आजारात आकस्मिकता असल्याबाबतचे खाजगी रुग्णालयाचे प्रमाणपत्र सादर करावे.

१५. खाजगी रुग्णालयात उपचार घेतला असल्यास प्रपत्र क व ड वर रुग्णालयाचा रजिस्टर नंबर टाकून ती जिल्हा शल्य चिकित्सकाकडून /जिल्हा आरोग्य अधिका-याकडून सांक्षाकिंत करुन सादर करावीत.

१६. देयकात व बाहेरुन खरेदी केलेल्या औषधात अल्कोहल व शक्तीवर्धक औषधांचा समावेश नसल्याचे खाजगी रुग्णालयाचे व जिल्हा शल्य चिकित्सकाचे/जिल्हा आरोग्य अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करावे.

DHO/CS

१७. आजार प्रमाणित करण्याबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक / जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे परिपूर्ण माहिती दर्शविणारे प्रमाणपत्र सादर करावे. प्रमाणपत्रात रुग्णाच्या आजाराचे नांव कॅपीटल लेटर्स मध्ये देऊन सदर आजार शासनाच्या १९ मार्च २००५ मधील ज्या आजारात मोडतो त्या आजाराचे नांव व क्रमांक दयावा. तसेच प्रमाणपत्रात आंतररुग्ण कालावधी व ना देय रकमा नमुद करुन आजारात आकस्मिकता होती किंवा नव्हती या बाबत स्पष्ट अभिप्राय दयावेत.

१८. प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यापूर्वी परिशिष्ट १ ते ५ मधील आवश्यक त्या कागदपत्राची व तपासणी सूचीची पूर्तता करुन प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा.

१९. उपरोक्त अनुक्रमांक (१) ते (१८) मधील सर्व बाबी अंतर्भूत करुन वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या प्रस्तावात अनुक्रमणिका व पृष्ठ क्रमांक दर्शविणे आवश्यक आहे, तरी अनुक्रमणिका

नसल्यास ते प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. उपरोक्त सर्व सूचना जिल्हा परिषदांनी त्यांच्या अभिपत्याखालील कार्यालयांच्या निदर्शनास आणून देऊन त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत त्यांना स्पष्ट सूचना दयाव्यात. तसेच शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतूदींचे पालन न झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी जिल्हा परिषदेची राहील.

(प्र.बा. पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-उप आयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.